# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/07/2023 (मंगळवार) दुपार


---

## घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर मौजा आंबेडकर कॉलोनी उमरेड येथे दिनांक ०२/०७/२०२३ चे २२.३० वा. ते दिनांक ०३/०७/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— विठ्ठल राजाराम नारनवरे, वय ४९ वर्ष, रा. घटाडी रोड उमरेड विठ्ठलनगर ता. उमरेड यांचा मित्र नामे— नितीन शंभरकर रा. आंबेडकर कॉलनी उमरेड हा आपल्या परिवारासह तामीलनाडु येथे फिरण्याकरिता गेला असता त्याचे राहते घराचे खिडकीची ग्रिल तोडुन १) सोन्याची पोत २ तोळे किंमती अंदाजे ७००००/— रू. २) सोन्याचा गोप १० ग्रॅम किंमती अंदाजे ३५०००/— रू ३) सोन्याची चैन ६ ग्रॅम किंमती अंदाजे २१०००/— रू. ४) सोन्याचे कानातले ६ ग्रॅमचे २ जोड किंमती अंदाजे ४२०००/—रू. ५) सोन्याचे कानातले ३ ग्रॅम किंमती अंदाजे १०५००/— रू ६) सोन्याची नथ १.५ ग्रॅम ५२५०/— रू. असे एकुण जुने वापरते किंमती अंदाजे १,८३,७५०/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने घरात प्रवेश करून कपाटात ठेवलेला चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे मो. क्र. ९७६३७०७९८४ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा उमरी ता. सावनेर येथे दिनांक ०१/०७/२०२३ चे ०६/०० वा. ते दिनांक ०२/०७/२०२३ चे ०८/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— स्वप्नील कृष्णाजी भुजाडे, वय ३२ वर्ष, रा. ह. मु. वानाडोंगरी वार्ड क्र. ०८, नागपूर यांची उमरी शिवारात ०४ एकर शेती आहे. त्या शेताच्या ओलीता करिता उमरी डॅम येथे मोटर किंमती १४०००/—रु. ची चार महिने पहिले बसविली त्या मोटरीने फिर्यादीचे शेतात उलत्याचे काम करित होते. दिनांक २५/०६/२०२३ चे दुपारी ०३/०० वा. फिर्यादी शेतात गेले आणि तेथुन उमरी डॅमला जावुन पाहीले तेव्हा फिर्यादीची ईलेक्ट्रीक मोटर डॅमवर होती फिर्यादी तेथुन सांयकाळी ०७/०० वा. त्याचे गावी नागपुर येथे गेले. दिनांक ०२/०७/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा. फिर्यादीचा भाऊ नामे — चँद्रशेखर भुजाडे याने फोन करुन सांगीतले "तु डॅमवर बसविलेली पाणडुबी मोटर दिसुन येत नाही" परंतु दिनांक ०१/०७/२०२३ चे सांयकाळी ०६/०० वा. पर्यत फिर्यादी शेतात हजर असतांना डॅमवर होती अशी माहीती मिळाल्याने फिर्यादीने शहानिशा करण्यासाठी दिनांक ०३/०७/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा. सुमारास शेतात व डॅमवर जावुन बघितले असता पाणडुबी मोटर किमंती अंदाजे १४०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार १५४७ मो. नं. ८००७४९२६५६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत आसाराम बापुचे आश्रमात फेटरी येथे दिनांक ०३/०७/२०२३ चे १३/३० वा. ते १५/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. वंदना नारायण हरकर, वय ४३ वर्ष रा. मेंढे पठार तह. काटोल ही नातेवाईकां सोबत गुरू पौर्णीमा असल्याने फेटरी येथे आसाराम बापुचे आश्रमात दर्शन करण्या करीता गेले होते. तेथे भावीकांची गर्दी होती दुपारी ०३/०० वा. सुमारास दर्शन झाल्यावर पाहीले असता फिर्यादीचे गळयात असलेली तिन तोळे वजनाची सोन्याची साखळी व पदक असलेली पोथ किंमती अंदाजे १,०५,२३५/—रूपये कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/४६७ सुनील मिश्रा मो. नं. ९९२३६९४४६७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**